# उद्धव ठाकरे हे रडवय्ये नेते; रडण्याशिवाय त्यांच्याकडे कोणतेही काम नाही

## भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची खरमरीत टीका

✔ सुराज्य/सोलापूर

**उद्धव ठाकरे हे ना चांगले मुख्यमंत्री बनले, ना चांगले पक्षप्रमुख. मुख्यमंत्री असताना ते कधी मंत्रालयात आले नाहीत तर पक्षप्रमुख असताना त्यांना आपले आमदार सांभाळता आले नाही. त्यामुळे आता सध्या ते रिकामे आहेत. त्यामुळे ते संजय राऊत यांना हाताशी धरून रोज रडत असतात. आतापर्यंत त्यांच्या झालेल्या सभेत ते फक्त रडतच होते. त्यामुळे ते बाळासाहेबांसारखे लढवय्ये नाही तर रडवय्ये नेते झाले आहेत, अशी खरमरीत टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.**




भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हे सोलापुरात भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक आणि मेळावा घेण्यासाठी आले असता आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, शिंदे-फडणवीस सरकारला सुप्रीम कोर्टाने मान्यता दिली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे व इतर कोणी काही म्हणतात त्याला महत्त्व नाही.न्यायालयाचा निकाल स्वतःच्या सोयींने लावून वारंवार जनतेमध्ये चुकीचे सांगणाऱ्या उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याकडून न्यायालयाचा अवमान होत आहे. भाजप या सर्व क्लिप आणि माहिती गोळा करून न्यायालयाचे हे निदर्शनास आणून देईल. कोर्टाच्या निर्णयानंतर आता त्यांच्याकडील उरले सुरले नेते भाजप आणि शिवसेनेमध्ये येतील आणि उद्धव सेनाही किंचित सेना राहील असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला.

संजय राऊत रोज सकाळी भोंग्याप्रमाणे रोज बोलतात. नुकतेच त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली आहे. वास्तविक पाहता फडणवीस यांच्यावर टीका करण्याची त्यांची पात्रता नाही. देवेंद्र फडणवीस यांचे रक्त भाजपचे होते आणि भाजपचे राहणार आहे. उद्धव सेनेसारखे काँग्रेस आणि राष्ट्रवादी सारखे त्यांचे रक्त नाही. देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना भावाप्रमाणे सांभाळले आहे. एक वेळ त्यांनी भाजपच्या नेत्यांची कामे केली नाहीत मात्र शिवसेनेच्या नेत्यांची सर्व कामे केली आहेत. हे उपकार त्यांनी विसरू नये. संजय राऊत हे काँग्रेसच्या साबणाने आंघोळ करतात आणि उद्धव सेनेला धुवून काढतात तसेच पवारांचा टिळा लावतात अशा शेलक्या शब्दात त्यांनी राऊतांवर टीका केली.

आगामी काळातील सर्व निवडणुका भाजपाचा विकासाच्या मुद्द्यावर लढणार आहे नरेंद्र मोदी यांनी नऊ वर्षात जी काही कामे केली आहे ती जनतेसमोर ठेवणार आहे आता आम्हाला विरोधीकांवर टीका करून जिंकण्याची कोणतीही गरज राहिलेली नाही असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, खासदार डॉक्टर जयसिध्देश्वर स्वामी, शहराध्यक्ष विक्रम देशमुख, आमदार राम सातपुते हे उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीच्या चुकीच्या निर्णयाने लांबणीवर पडल्या आहेत. चुकीची प्रभाग रचना चुकीच्या पद्धतीने सदस्य संख्या वाढवणे असे प्रकार केले आहेत. जनगणना झाली नाही तरीही महाविकास आघाडीने प्रभाग संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला. आमचे सरकार आल्यावर २०११ च्या जनगणनेनुसार प्रभाग संख्या केली मात्र त्या विरोधात महाविकास आघाडी कोर्टात गेली आहे. त्यामुळे निवडणुका रखडल्या आहेत. आमची उद्याही निवडणुकीत झाल्या तरी तयारी आहे, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले

### भाजप लोकसभेला सर्व जागा जिंकेल

कोर्टाच्या निकालानंतर भाजप आणि शिवसेनेचे सरकार हे संविधान एकच होते हे सिद्ध झाले आहे. आगामी विधानसभा आणि लोकसभा भाजप व सेना एकत्र लढणार आहे. विधानसभेला २०० पेक्षा जास्त जागा आणि लोकसभेला सर्वच्या सर्व ४८ जागा भाजप निश्चित जिंकेल असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

### राष्ट्रवादीचा तीन दिवसांचा तमाशा सगळ्यांनी बघितला

शरद पवारांना कोणीही राजीनामा द्यायला सांगितला नव्हत. त्यांनी राजीनामा दिला त्यांनीच नेमलेल्या समितीने तो फेटाळला आणि त्यांनीच पुन्हा राजीनामा मागे घेतला असे हे तीन दिवसाचे वगनाट्य होते महाराष्ट्राला एक चांगला तमाशा पाहायला मिळाला वास्तविक पाहता शरद पवार यांनी राजीनामा द्यायला नको होता दिला तर तो माघारी घ्यायला नको होता यावरून राष्ट्रवादीमध्ये दुसरे कोणतेही नेतृत्व नाही हेच सिद्ध होते. अजित पवार यांनी कधीही आमच्याशी संपर्क साधला नाही. आमच्यातले कोणीही त्यांना भाजपमध्ये येण्याचे निमंत्रण दिले नाही. खुद्द अजित पवार यांनीही आपण भाजपमध्ये जाणार नाही असे सांगितले नंतर हा प्रश्न मिटला आहे असे मला वाटते असेही बावनकुळे म्हणाले.

### काँग्रेसला लोकसभेसाठी उमेदवारही मिळणार नाहीत

काँग्रेसला भारत जोडोचा कोणताही फायदा होणार नाही. ज्यावेळी नांदेडपासून शेगावपर्यंत ही यात्रा जात होती, त्यावेळी हजारो काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. लोकसभेची आचारसंहिता लागल्यानंतर कोणालाही वाटणार नाही असे नेते भाजपमध्ये प्रवेश करतील. काँग्रेसला तर लोकसभेसाठी उमेदवारही मिळणार नाहीत. मागच्या वेळीच पेक्षा कमी जागा काँग्रेसला यावेळेस मिळतील असेही बावनकुळे म्हणाले.



## नातेपुते येथे अध्यात्मिक बाल संस्कार शिबीर उत्साहात

✔ **नातेपुते** : श्री ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाला नातेपुते आयोजित आध्यात्मिक बाल व युवा संस्कार शिबिर नातेपुते ४ मे ते १० मे मोठ्या उत्साहाने साजरे करण्यात आले यामध्ये सकाळी पूजन त्यानंतर अल्पोपहार , पर्यंत विविध कक्षा .दुपारी कक्षा,विविध कार्यक्रम, संध्याकाळी जिनेन्द्र भक्ती ध्यान व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. बालकांना विविध प्रकारे संस्कारीत केले गेले यामध्ये बालकांने कसे आचरण करावे, कसे बोलावे गुरूंचा, आई-वडिलांचा कसा आदर करावा व आजकालच्या मोबाईलच्या युगामध्ये कसे त्याचा उपयोग करावा हे सुद्धा या शिबिरामधून जाणून घेतले. हे शिबिर पं. संजय सिद्धार्थ इंदोर व त्यांचे सहयोगी पं. आकाश जैन, सम्मेद जैन, उमंग जैन, निखिल जैन तसेच पिंकल दीदी, प्रिया भाभी व भाग्यश्री दिदी, साक्षी दिदी, प्रतीति दीदी व स्थानिक विद्वान व स्वाध्याय प्रेमी युवा वर्ग यांचा भरपुर सहयोग प्राप्त झाला.पुजन व भक्ती यांमुळे या शिबिराला मानाचा कलश चढविला गेला. शिबिर हर्ष उल्हास आणि आनदायक वातावरणात संपन्न झाले. शिबिरामध्ये सकल जैन समाजातील बालक वर्ग सहभागी झाला होता.

## डॉ.आंबेडकरांच्या बार्शी भेटीच्या शताब्धी निमित्त अशोकस्तंभ उभारण्याची मागणी

✔ **बार्शी** : विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मे १९२४ च्या ऐतिहासिक बार्शी तालुका भेटीला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमीत्ताने शहरातील भीमनगर चौक येथे अशोकस्तंभ व ग्रंथालय उभारण्याच्या मागणीचे निवेदन पालिकेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांना देण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर कार्य करणारे सर्व सामाजिक संघटना व राजकिय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन बहुजन क्रांती मोर्चा या संघटनेच्यावतीने हे निवेदन देण्यात आले. यावेळी रिपाइं नेते आण्णासाहेब लोंढे, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष विवेक गजशीव, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष वसीम पठाण, कामगार नेते अजित कांबळे, इब्राहिम शेख, वंचित बहुजन आघाडीचे शोयब शेखशरद बनसोडे, रुपेश बंगाळे, आनंद चांदणे, आशिष शिंदे, सामाजिक कार्यकर्ता पवन गायकवाड, अविनाश भालशंकर, वंचित बहुजन आघाडी लंकेश्व, बहुजन क्रांती मोर्चा सोलापूर जिल्हा संयोजक तानाजी बोकेफोडे, बामसेफ सोलापूर जिल्हा अध्यक्ष भाऊसाहेब कांबळे, भारत मुक्ती मोर्चा सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष रणजीत सोनवणे आदी उपस्थित होते.

## पारधी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू

### बावनकुळे यांचे आश्वासन

✔ सुराज्य/सोलापूर



भपारधी समाज गेल्या अनेक वर्षांपासून उपेक्षित राहिला आहे. पारधी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून सरकार दरबारी प्रश्न मांडणार आहे. पारधी समाजाच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, पारधी समाज आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठी समाजाचा विकास करण्यासाठी भाजप कटिबद्ध असल्याचे आश्वासन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी दुपारी सामाजिक एकत्रीकरण बैठकीस हजेरी लावली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी

शुक्रवारी भाजप युवा वॉरियरच्या शाखेचे उद्घाटन बलिदान चौकात प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विजयपूर रस्त्यावरील इंदिरानगर येथील आदर्श बूथला भेट देऊन त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप कार्यकर्त्यांच्या कामाचे कौतुक केले.

## मालट्रकचा अपघात; साडेबारा लाखांचे तेलाचे बॉक्स पळवले

✔ **मोहोळ** : सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर तेलंगवाडी शेटफळ दरम्यान तेल घेवून जाणार ट्रकचा अपघात झाल्यानंतर येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनी साडेबारा लाखांचे तेलाचे बॉक्स चोरून पळवून नेले याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार गायत्री ट्रान्सपोर्ट कडील ट्रक नं एम एच ४६ एफ ११२१ यामध्ये रेकॉन ऑईल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड हैद्राबाद या कंपनी मधून वेगवेगळ्या प्रकारच्या तेलाचे बॉक्स भरण्यात आले होते. सदर ट्रक वर युवराज प्रकाश निबाळकर (कोंडी, ता.उत्तर सोलापूर) हे ड्रायव्हर म्हणून काम करतात सदरचा माल भिवडी मुबई येथील कंपनी गोडावून मध्ये खाली करावयाचा होता परंतू त्या टूकचा तेलंगवाडी शेटफळ दरम्यान ५ मे रोजी सायं पाच वाजणे च्या सुमारास अपघात झाला.



## राजेश काळे यांचे निलंबन रद्द भाजपात झाला पुनर्प्रवेश

✔ सुराज्य/सोलापूर

माजी उपमहापौर राजेश काळे यांचे निलंबन अखेर रद्द करण्यात आले. आ. सुभाष देशमुख यांच्या सांगण्यावरून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत त्यांचा भाजपात झाला पुनर्प्रवेश झाला.

पारधी समाजासाठी सातत्याने कार्य करणारे भाजपाचे माजी उपमहापौर राजेश काळे यांनी शुक्रवारी सामाजिक एकत्रित बैठकीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला बावनकुळे यांची उपस्थिती होती. सायंकाळी झालेल्या भाजपाच्या महाबैठकीत त्यांना पक्षात पुन्हा प्रवेश देण्यात आला.

अख्ख्या भारतामधील आदिवासी पारधी समाजाचा मी पहिला उपमहापौर आहे. मी भाजपचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून कायम काम करत राहीन. पक्षाने मला पुन्हा संधी दिली आहे, त्यामुळे संपूर्ण पक्षासह आ. सुभाष देशमुख यांचे मी आभार मानतो, असे राजेश काळे यांनी सांगितले.

## रविवारी माजी विद्यार्थी मेळावा

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, विज्ञान महाविद्यालय, सांगोला येथे रविवार दि.१४ मे रोजी सकाळी १० वाजता ऑनलाईन माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कॉलेजमधील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देणे व त्यांच्या समस्या सोडवणे. ह्या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांकडून त्यांचे मनोगत ऐकून घेऊन प्रवेशित विद्यार्थ्यांना सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सदर माजी विद्यार्थी मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून

विलास कोळेकर जिल्हा निबंधक वर्ग-१ व अध्यक्ष म्हणून दादासाहेब अनुसे उद्योगपती राज उदयोग समूह हे उपस्थित राहणार आहेत. तरी माजी विद्यार्थ्यांने सदरं मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांनी केले आहे.



रजिस्ट्री सं.डी.एल.-33004/99 REGD.No.D.L.-33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-15042023-245181
CG-DL-E-15042023-245181

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 1650] नई दिल्ली, बृहस्पतिवार, अप्रैल 13, 2023/चैत्र 23, 1945
No. 1650] NEW DELHI, THURSDAY, APRIL 13, 2023/CHAITRA 23, 1945

सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

अधिसूचना

नई दिल्ली, 13 अप्रैल, 2023

**का.आ. 1730(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि **महाराष्ट्र राज्य के सोलापूर जिले में NH548E के कि.मी. 98.65 से कि.मी.141.6 महस्वड-पिलीव-पढ़रपुर मार्ग (डिप्टी कलेक्टर भूमि अधिग्रहण 11, मध्यवर्ती इमारत, पहला मंजिल, एक खंड, सोलापुर. )** तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् **डिप्टी कलेक्टर भूमि अधिग्रहण 11 सोलापूर** को लिखित रूप में प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

अनुसूची

**महाराष्ट्र राज्य के सोलापूर जिले में NH548E के कि.मी. 98.65 से कि.मी.141.6 महस्वड-पिलीव-पढ़रपुर मार्ग (डिप्टी कलेक्टर भूमि अधिग्रहण 11, मध्यवर्ती इमारत, पहला मंजिल, एक खंड, सोलापुर. ) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।**

| राज्य का नाम: महाराष्ट्र जिले का नाम: सोलापूर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| तालुक का नाम: मालशिरस | | | | | |
| गांव का नाम: तांदूलवाडी | | | | | |
| 1 | 881/1/अ | निजी | नम | 0.2710000(हेक्टेयर) | 0.2710000 |
| 2 | 919/2ब | निजी | नम | 0.1651000(हेक्टेयर) | 0.1651000 |
| 3 | 920/2/ब/2 | निजी | नम | 0.1156000(हेक्टेयर) | 0.1156000 |
| तालुक का नाम: पंढरपुर | | | | | |
| गांव का नाम: वाखरी | | | | | |
| 1 | 638/1 | निजी | नम | 0.0360000(हेक्टेयर) | 0.0360000 |
| 2 | 638/2 | निजी | नम | 0.0340000(हेक्टेयर) | 0.0340000 |
| | | | कुल | 0.6217 | 0.6217 |

जिमाका/सो/जाहि/१६/२०२३-२४

[फा.सं. १२०३७/२८/२०१७-MAH(P-6)3A]
अभय जैन, उप सचिव

## सेवाव्रती परिचारिकांबद्दल कृतज्ञता आवश्यक : प्रा.डॉ.येळेगावकर

✔ सुराज्य/सोलापूर



रुग्णसेवा, रुग्णसुश्रूषा करणे हा उदात्त, पवित्र व्यवसाय असून ज्या परिचारिका रुग्णसेवा करताना कर्तव्यतत्परता, जबाबदारीचे भान, रुग्णाप्रती सहानभूती, आपुलकी, जिव्हाळा ठेवतात, सतत अद्ययावत ज्ञान घेऊन त्याचा दैनंदिन कामकाजात उपयोग करतात, रुग्ण व डॉक्टर, डॉक्टर व रुग्ण, रुग्ण व नातेवाईक यांच्यातील महत्वाचा दुवा ठरू शकतात. अशा सेवाव्रती परिचारिकांबद्दल समाजाने कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक असते कारण त्या मानवतेची सेवा करत असतात असे प्रतिपादन प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते इंडियन मेडिकल असोसिएशन, सोलापूर, सोलापूर प्रायव्हेट हॉस्पिटल्स ओनर्स असोसिएशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णसेवेची जननी मानल्या गेलेल्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या जयंती दिनी जागतिक परिचारिका दिनानिमित्त इंडियन मेडिकल असोसिएशन च्या डफरीन चौक येथील सभागृहात आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर इंडियन मेडिकल असोसिएशन सोलापूरचे अध्यक्ष डॉ. केदार कहाते, उपाध्यक्ष डॉ. शेखर चिडगुपकर, सचिवा डॉ. रूपाली रायखेलकर, डॉ. हर्षवर्धन जोशी, कोषाध्यक्ष डॉ. तनवांगी जोग, सोलापूर प्रायव्हेट हॉस्पिटल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रकाश घाटोळे, डॉ. मोनिका उंबरदंड, डॉ. किरण सारडा, फॅमिली प्लॅनिंगचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

कार्यशाळेत फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया पद्मावती क्लिनिक, मांगल्य नर्सिंग होम, रघोजी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, कस्तुरी नर्सिंग होम, कुमठेकर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, बसवेश्वर हॉस्पिटल, स्पॅन हॉस्पिटल, तपस्या नर्सिंग होम, कादरी हॉस्पिटल, प्राईड हॉस्पिटल, सोलापूर केयर हॉस्पिटल, विजय क्लिनिक, गोपाबाई दमाणी रक्त संकलन केंद्र, निरामय क्लिनिक, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (सिव्हील हॉस्पिटल), सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाचे रामवाडी नागरी आरोग्य केंद्र, बाळे नागरी आरोग्य केंद्र, जोडभावी पेठ नागरी आरोग्य केंद्र, मुद्रा सनसिटी नागरी आरोग्य केंद्र, दाराशा प्रसुतीगृह, डफरीन हॉस्पिटल, जिजामाता नागरी आरोग्य केंद्र, विडी घरकुल नागरी आरोग्य केंद्र, भावना ऋषी नागरी आरोग्य केंद्र, दाराशा नागरी आरोग्य केंद्र, चाकोते प्रसूतीगृहाचे एकूण १६० परिचारिका उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, भेटवस्तू व बुके देऊन सेवाव्रती परिचारिकांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. तनवांगी जोग यांनी केले. प्रास्ताविक डॉ. केदार कहाते यांनी केले.

आभार डॉ. रूपाली रायखेलकर यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी कल्पना गडगडे, विजय शिंदे, आकाश गायकवाड, वीरेंद्र परदेशी, दिनकर बनसोडे, करण खानापुरे, रोजमेरी गायकवाड, मिथुन भोसले, आशालता मस्के, लक्ष्मी ढगे, शुभांगी नाईकवाडी यांनी परिश्रम घेतले.